# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः25.04.2025** **वारःशुक्रवार**

---

•पहलगाममध्ये हल्ला करणाऱ्यावर त्यांनी कल्पनाही केली नसेल अशी कारवाई केली जाईल – पंतप्रधानांचा इशारा

•पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर दहशतवादाविरोधातील सरकारच्या कृतीला सर्व पक्षांचा पूर्ण पाठिंबा

•काश्मीरमध्ये गेलेले महाराष्ट्रातले 500 पर्यटक सुखरूप परतले;

•पोप फ्रान्सिस यांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित राहण्यासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज व्हॅटिकन सिटीला रवाना होणार

•आणि

•देशाच्या वायव्य भागात उष्णतेची लाट; तर इशान्येकडे मुसळधार पावसाची शक्यता

**<u>पंतप्रधानआश्वासन</u>**

पहलगाममध्ये हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना आणि त्यांना मदत करणाऱ्यांना, त्यांनी कल्पनाही केली नसेल अशी शिक्षा केली जाईल, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे. ते काल मधुबनी इथे राष्ट्रीय पंचायत राज दिनानिमित्त आयोजित जाहीर सभेत बोलत होते. माणुसकीवर विश्वास ठेवणारा प्रत्येक जण भारतासोबत आहे, असंही पंतप्रधान म्हणाले,

S /B पंतप्रधान ---स्क्रिप्ट

यह हमला केवल पर्यटकों पर नहीं हुआ है, देशके दुश्मनों ने भारत की आत्मा पर प्रहार करने का दुस्साहस किया है। मैं, मोहित, स्पष्ट शब्दों में कहना चाहता हूँ किजिन्होंने यह हमला किया है, उन आतंकियों को और इस साजिश को रचनेवालों को उनकी कल्पना से भी बड़ी सज़ा मिलेगी — और यह सज़ा ज़रूर मिलेगी। अब वक्तआ गया है कि आतंकियों की बची-खुची ज़मीन को भी मिट्टी में मिला दिया जाए।"

भाषणाला सुरुवात करण्यापूर्वी पंतप्रधानांनी एक क्षण मौन पाळून या हल्ल्यात प्राण गमावलेल्यांना श्रद्धांजली वाहिली.

**<u>सर्वपक्षीय बैठक</u>**

दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानच्या विरोधात मंत्रिमंडळाच्या सुरक्षाविषयक समितीने सीसीएसने केलेल्या कारवाईला सर्व पक्षांनी पाठिंबा दर्शवला आहे. दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात सर्व संभाव्य कृतींनाही आपला पूर्ण पाठिंबा असेल, असं आश्वासनही सर्व विरोधी पक्षांनी सरकारला दिलं आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सरकारनं काल नवी दिल्ली इथे संसद भवन संकुलात बोलविलेल्या सर्वपक्षीय बैठकीमध्ये त्यांनी हे आश्वासन दिलं. या बैठकीत संरक्षण मंत्र्यांनी पहलगाम इथल्या घटनेची आणि त्या विरोधात सीसीएसच्या बैठकीत भारत सरकारनं केलेल्या कृतींची माहिती दिली. सर्व पक्षांनी या दहशतवादी हल्ल्याबद्दल चिंता व्यक्त करून त्या विरोधातल्या सर्व कृतींना संपूर्ण पाठिंबा व्यक्त केला, अशी माहिती संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना दिली.

**<u>बाईट – रिजिजू</u>**

या घटनेच्या विरोधात आणखी कठोर कारवाई करण्याची इच्छाही सरकारच्या वतीनं बैठकीत व्यक्त करण्यात आली. या बैठकीत सर्वच पक्षांनी पहलगाम हल्ल्याचा निषेध केला; सरकारकडून केल्या जाणाऱ्या कोणत्याही कारवाईला आपला पाठिंबा असेल असं लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितलं. जम्मू काश्मीरमध्ये शांतता राखण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी व्यक्त केली.

**<u>बाईट – खरगे</u>**

**<u>राष्ट्रपती</u>**

पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची राष्ट्रपती भवन इथे भेट घेतली. जयशंकर यांनी निवडक देशांच्या राजदूतांशी देखील काल या संदर्भात चर्चा केली. जर्मनी, जपान,पोलंड, युके आणि रशिया या देशांचे राजदूत यावेळी उपस्थित होते.

दरम्यान जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी श्रीनगरमध्ये काल सर्वपक्षीय बैठक घेतली. बैठकीत केंद्र सरकारच्या पाकिस्तान विरुद्धच्या सर्व निर्णयांना पाठिंबा देण्यात आला आणि हल्ल्याचा तीव्र निषेध करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं .

बैठकीत सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सरकारांना काश्मिरी विद्यार्थी आणि नागरिकांच्या सुरक्षेचं आवाहन करण्यात आलं .

लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी आज जम्मू आणि काश्मीरला भेट देणार आहेत. लष्करप्रमुख, परिसरातील सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेतील. उच्च लष्करी कमांडर लष्करप्रमुखांना खोऱ्यात आणि नियंत्रण रेषेजवळील दहशतवादविरोधी उपाययोजनांबद्दल माहिती देतील.

**<u>बक्षीसजाहीर</u>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात सहभागी असलेल्या लष्कर-ए-तोयबाच्या तीन दहशतवाद्यांची माहिती देणाऱ्याला जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी ६० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलं आहे. हाशिम मुसा उर्फ सुलेमान आणि अली भाई उर्फ तुल्हा भाई हे दोन्ही दहशतवादी पाकिस्तानी नागरिक असल्याचं समजलं आहे. तिसरा दहशतवादी अनंतनाग जिल्ह्यातील आदिल हुसेन ठोकर हा आहे. माहिती देणाऱ्यांची ओळख गुप्त ठेवली जाईल. राष्ट्रीय तपास यंत्रणेने पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तपास सुरू केला आहे.

**<u>सीमाबंद</u>**

भारताने अटारी सीमा बंद करण्याचा निर्णय घेतला असून पंजाबमध्ये अमृतसरमधील अटारी, फिरोजपूरमधील हुसैनीवाला आणि फाजिल्का इथल्या रोड रिट्रीट समारंभांचं प्रमाण कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

दरम्यान, काल अटारी मार्गे २८ पाकिस्तानी नागरिक भारतातून पाकिस्तानला गेले आणि १०५ भारतीयही परतले आहेत.

**<u>हवाईबंदी</u>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत - पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय विमान कंपन्यांना पाकिस्तानच्या हवाई क्षेत्राचा वापर करण्यास बंदी घालणार असल्याचं पाकिस्तानने म्हटलं आहे. त्यामुळे भारतातील नोंदणीकृत विमानं तसंच भारतीय कंपन्यांच्या मालकीची किंवा भाडेतत्त्वावर घेतलेली विमानं पाकिस्तानच्या हवाई क्षेत्राचा वापर करू शकणार नाहीत. उत्तर अमेरिका, ब्रिटन, युरोप आणि मध्य पूर्वेकडची एअर इंडियाची काही उड्डाणं पर्यायी विस्तारित मार्गाने जातील असं एअर इंडियाने म्हटलं आहे.

**<u>पर्यटक</u>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर गेल्या 2 दिवसात महाराष्ट्रातले सुमारे 500 पर्यटक राज्यात परतले आहेत. राज्य सरकारने या पर्यटकांसाठी दोन विशेष विमानांची व्यवस्था केली होती, त्यातून 184 पर्यटक काल मुंबईत दाखल झाले. आणखी 232 प्रवाशांसाठी आज एका विशेष विमानाची व्यवस्था राज्य सरकारनं केली आहे. काश्मिरमध्ये अडकलेल्या महाराष्ट्राच्या पर्यटकांना परत आणण्यासाठी मंत्रालय, मुख्यमंत्री कार्यालय आणि महाराष्ट्र सदनातील कक्ष अशी त्रिस्तरीय यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या विनंतीवर काम केलं जात आहे.

**<u>राष्ट्रपतीव्हॅटिकन</u>**

पोप फ्रान्सिस यांच्या अंत्यसंस्काराला उपस्थित राहण्यासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू - आज व्हॅटिकन सिटीच्या दौऱ्यावर जात आहेत. या भेटीत राष्ट्रपती मुर्मू भारत सरकार आणि जनतेच्या वतीने शोकसंदेश देखील पोहोचवणार आहेत.

राष्ट्रपती आज सेंट पीटरच्या बॅसिलिका इथे पुष्पहार अर्पण करून पोप फ्रान्सिस यांना श्रद्धांजली वाहतील. उद्या २६ एप्रिल रोजी राष्ट्रपती मुर्मू जगभरातील मान्यवरांच्या समवेत पोप यांच्या अंत्यसंस्कार कार्यक्रमात सहभागी होतील, असं परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात म्हटलं आहे.

पोप फ्रान्सिस यांचं २१ एप्रिल रोजी निधन झालं. पोप फ्रान्सिस यांच्या निधनानंतर भारताने तीन दिवसांचा राजकीय दुखवटा जाहीर केला आहे.

**<u>क्रिकेट</u>**

आयपीएल टी-२० क्रिकेटमध्ये बेंगळुरू इथे झालेल्या कालच्या सामन्यात, रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूने राजस्थान रॉयल्स संघाचा ११ धावांनी पराभव केला.
आज संध्याकाळी साडेसात वाजता चेन्नई सुपर किंग्ज आणि सनरायझर्स हैदराबाद संघारम्यान चेन्नई इथे खेळला जाईल.

**<u>योगासनस्पर्धा</u>**

नवी दिल्लीतल्या इंदिरा गांधी इन्डोअर स्टेडियमवर आजपासून दुसरी आशियाई योगासन विजेतेपद स्पर्धा सुरू होत आहे. तीन दिवस म्हणजे २७ तारखेपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत २१ आशियाई देशांमधले १७० हून अधिक योगपटू सहभागी होणार आहेत. योगासनांचा जागतिक पातळीवर स्पर्धात्मक क्रीडा प्रकार म्हणून प्रसार करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>हवामान</u>**

हवामान - आगामी तीन ते चार दिवस वायव्य भारतात उष्णतेच्या लाटेची परिस्थिती राहील अशी शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. छत्तीसगड, पश्चिम बंगाल, सिक्कीम, बिहार, ओडिशा, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि तेलंगण इथे उद्यापर्यंत उष्णतेच्या लाटेची परिस्थिती राहण्याची शक्यता आहे.
तर रविवारपर्यंत पश्चिम बंगाल, सिक्कीम, आसाम आणि मेघालयात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. अरुणाचल प्रदेश आणि नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरा इथेही मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**